जिल्हा परिषद, अहमदनगर ZILLA PARISHAD AHMEDNAGAR
शिक्षण विभाग (प्राथमिक) Education Department (Primary)
www.nagarzp.gov.in ahmednagarzp@gmail.com
शिक्षणाधिकारी श्री कडुस अशोक Education Officer Mr. Kadus Ashok

नमुना- 2

ग्राम:-घुलेवाडी दुरध्वनी :-(02425)206083 फॅक्स :-(02425) 222222मोबाईल :- 9403234532
युडायस क्रमांक 27261207306 ई मेल:- my.strawberry@rediffmail.com
जावक क्रमांक : 346 दिनांक :- 24/03/2019
जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे कार्यालय, अहमदनगर, महाराष्ट्र
जावक क्रमाक:-RTE/स्वमा/12057/2019 दिनांक:- 29/3/2019
व्यवस्थापक -श्री व्यंकटेश एज्युकशन सोसायटी, संगमनेर

विषय - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम 2011 याच्या नियम 11,पोट - नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र दंण्याबाबत .

माननीय महांदय /महोदया ,

आपल्या दिनांक 24/03/2019 शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार /शाळेची केलेली तपासणी या आधारे मी अशोक कडूस, शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद अहमदनगर दिनांक 1/4/2019 पासून दिनांक 31/3/2022 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी

इयत्ता 1 ते इयत्ता10 करिता स्ट्रॉबेरी ईंग्लिश मेडियम स्कूल, घुलेवाडी या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.
वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे.

1. मान्यता कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009 (जोडपत्र एक ) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन ) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.
3. शाळा नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलंल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यांत येईल.
5. संस्था/शाळा कोणत्याही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा तीच्या माता- पित्यास किंवा पालकांस भाग पाडणार नाही .
6. कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म ,जात किंवा वंश ,जन्मठिकाण किंवा या पैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यांत येणार नाही .
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो कोणत्याही इयत्तंत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यांत येणार नाही .
   (दोन) कोणत्याही बालकांस शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देणार नाही .
   (तीन) कोणत्याही बालकांस प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही .
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यांत येईल .
   (पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तुरतदीनुसार समावेश करण्यांत येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
   (सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.
8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलंल्या अभ्यासक्रमांच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील .
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील

मागील तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या

| | |
|---|---|
| शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | _8000 चौ.मी. |
| एकूण बांधकाम क्षेत्र | _3900 चौ.मी. |
| खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | _6000 चौ.मी |
| वर्गखाल्यांची संख्या 27 कार्यालय -नि-भांडार-नि-मुख्याध्यापकांची खोली | 3 |
| मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधगृहे स्वतंत्र आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल. | आहे |
| पिण्याच्या पाण्याची सुविधा | आहे |
| दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | |
| अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामुग्री /ग्रंथालय यांची उपलब्धता | आहे |
| वाचन साहित्य विनासायास उपलब्ध | आहे |

Principal
Strawberry English Medium School
Ghulewadi, Tal. Sangamner
Dist. Ahmednagar (Maharashtra)

Secretary
For Shri Vyankatesh Education Society
Sangamner, Dist. Ahmednagar

11 मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत .

12 शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यांत येतील.

13 शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम 1860(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यांत येत आहे.

14 शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्तिसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही .

15 शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षेत व प्रमाणित करुन घ्यावे आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याकडे पाठविण्यांत यावी .

16 तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक | 1 | 2 | | 1 | 1 | 0 | | 3 | 3 | | 0 | 5 | 7 | असा आहे .
हा कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना तो नमूद करावा याची नोंद घ्यावी.

17 शिक्षण संचालक /जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनाचे पालन करावे.

18 संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण सुनिश्चित करावी .

19 जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

20 संस्थेच्या मा. धर्मदाय आयुक्त यांचे कडील नोंदणीबाबत अपुर्तता, पदाधिकारी चेंज रिपोर्ट (बदल अहवाल) , नुतनीकरण, लेखापरिक्षण इत्यादी संदर्भातील प्रकरणे प्रलंबित असल्यास सदर अहवालाची पुर्तता करुन घ्यावी व मा. धर्मदाय आयुक्त यांचेद्वारे मिळालेली परिशिष्ट 1ची अद्ययावत प्रत शालेय दप्तरी जतन करुन ठेवावी.

21 संस्थेत वाद असल्यास मा. धर्मदाय आयुक्त, अहमदनगर यांचेद्वारे अंतीम निश्चित केलेल्या परिशिष्ट 1 मधील पदाधिकारी किंवा मा. धर्मदाय आयुक्त यांचेद्वारे सदर संस्थेच्या शाळेवर नेमलेल्या प्रशासकास देण्यात येईल.

22 शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या निर्णयांचे, परिपत्रकांचे, आदेशांचे व कार्यपद्धतीचे पालन करणे संस्था व शाळा दोहोंवर बंधनकारक राहील.

23 स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावरील शाळेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्य शाळा (स्थापना व विनियम अधिनियम 2012 (सन 2013 चा 01) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

24 शासनाकडून , स्ट्रॉबेरी ईंग्लिश मेडियम स्कूल,घुलेवाडी या नावाने ईंग्रजी माध्यमासाठी घुलेवाडी या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. भविष्यात माध्यम व ठिकाण यामध्ये कोणताही बदल करता येणर नाही. संस्थेने अथवा शाळेने त्यात कोणताही बदल केल्यास सदर मान्यता आपोआप रद्द होईल. तसेच या बदल दिनांकापासून सदर शाळा अनाधिकृत समजण्यात येईल.

25सक्षम अधिकाऱ्यांकडून सदर शाळेस युडायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहील. तथापी शाळेमध्ये प्रविष्ठ झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती सरल प्रणलीमध्ये समाविष्ट करणे, अद्ययावतन करणे, आधार लिंकिंग करणे , विहीत मुदतीत व नमुन्यात युडायस प्रपत्र संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करणे , प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे इ. बाबतची जबाबदारी शाळेची राहील.

आपला विश्वासू

(अशोक कडूस)
शिक्षणाधिकारी (प्राथ )
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत,

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती संगमनेर , जिल्हा अहमदनगर
सदर स्वमान्यता प्रत नमुना -2 प्रतिस्वाक्षरी व शिक्क्याने प्रमाणित करावी.

Principal
Strawberry English Medium School
Ghulewadi, Tal. Sangamner
Dist. Ahmednagar (Maharashtra)

Secretary
For Shri Vyankatesh Education Society
Sangamner, Dist. Ahmednagar.